सकाळ

05.06.2025

# तब्बल २२ वर्षानंतर भेटली 'माय'

## येरवडा मनोरुग्णालय, श्रद्धा फाउंडेशनच्या प्रयत्नांना यश

पुणे, ता. ५ : मुलगा, दोन मुली अशा तीन चिमुकल्यांना जन्म दिल्यानंतर मानसिक आजारामुळे कर्नाटकमधील बेल्लारी जिल्ह्यातील 'लक्ष्मी' (वय ५८) घर सोडून निघून गेली. आईच्या मायेने पोरके झालेल्या मुलांनी तिची आशा सोडली होती. आता आई या जगात नसेल या विचाराने तिच्या जपून ठेवलेल्या साडीची ते २२ वर्षे पूजा करायचे. परंतु येरवडा मनोरुग्णालय व श्रद्धा फाउंडेशनच्या प्रयत्नाने त्या भावंडांना २७ मे रोजी माय 'लक्ष्मी' पुन्हा भेटल्याने त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

मानसिक आजाराने ग्रासलेली लक्ष्मी वारंवार घर सोडून जायची. पती पेदन्ना तिला पुन्हा पुन्हा शोधून आणत होता. पण एके दिवशी ती हरवली ते कायमचीच. त्यातच तिच्या पतीचे २००६ मध्ये निधन झाले व तीन मुले पोरकी झाली. दरम्यान, कर्नाटकातून घराबाहेर पडलेली लक्ष्मी भटकत-भटकत ऑक्टोबर २०१६ मध्ये इंदापूरला पोहोचली. भिकाऱ्याच्या वेशात असलेली लक्ष्मी दिसेल त्यावर काठी उगारायची. स्थानिक पोलिसांनी शिवाजीनगर न्यायालयाच्या आदेशाने तिला येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात दाखल केले. येथे उपचार घेऊन ती बरीही झाली.

आता प्रश्न होता तिच्या घरच्यांना शोधण्याचा. पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने तिला दोन वर्षांपूर्वी येरवडा मनोरुग्णालयातून रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील श्रद्धा फाउंडेशनच्या पुनर्वसन केंद्रात पाठवण्यात आले. संस्थेतील कार्यकर्त्यांनी तिला बोलते करून मिळालेल्या माहितीनुसार तिच्या घरच्यांचा शोध घेण्यासाठी रुग्णवाहिकेने कर्नाटकातील बेल्लारी जिल्ह्यातील मुल्लार पेठगाव गाठले. तेथील लोकांना भाषेची अडचण असल्याने त्यांनी लक्ष्मीचे छायाचित्र दाखवून कुटुंबाची चौकशी केली. परंतु त्या पत्त्यावर लक्ष्मीचे कुटुंब नसल्याने ते पुन्हा परतले. दरम्यान, लक्ष्मीचा मुलगा व्यंकटेशला याबाबत माहिती मिळाली. मात्र, तो गावात येईपर्यंत फाउंडेशनचे सहकारी निघून गेले होते.

> प्रसूतीच्या काळात ताणतणाव व घरातील अज्ञानामुळे उपचार घेता आले नाही. वेळीच मानसिक आजाराचे निदान झाल्यास उपचार होऊन रुग्ण बरे होऊ शकतात. जेणेकरून कुटुंबाची व समाजाची घडी विस्कटणार नाही.
> - **डॉ. क्षमा राठोड**, वरिष्ठ मनोविकारतज्ज्ञ, येरवडा मनोरुग्णालय

> येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयात दीडशे रुग्ण दीर्घकालीन वास्तव्यास आहेत. या रुग्णांना घरी सोडण्यासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी रुग्णांच्या नातेवाइकांनी व समाजाने सहकार्य करण्याची गरज आहे. औषधासोबतच रुग्णांना प्रेमाची गरज असते. तरच समाजातील मानसिक आजारावर आपण मात करू शकतो.
> - **डॉ. श्रीनिवास कोलोड**, अधीक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा, पुणे

### आईसाठी व्यंकटेशचा पाठपुरावा

■ आईच्या प्रेमासाठी आतुरलेल्या व्यंकटेशने चिकाटी न सोडता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून रुग्णवाहिकेवर लिहिलेल्या मोबाईल नंबरवर संस्थेत संपर्क साधला. या वेळी आई तेथे असल्याचे समजताच त्याने क्षणाचाही विलंब न करता दोन बहिणी लिंगम्मा व हनुमक्का यांच्यासह फाउंडेशनचे पुनर्वसन केंद्र गाठले. तेथे आईला पाहिल्यानंतर त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. व्यंकटेश हा स्वतःची मालवाहू गाडी चालवतो, तर हनुमक्का परिचारिका आहे.

### संस्थेचा अविरत प्रयत्न

■ परिचारिका मंगल बांगर, समाजसेविका फरीदा शेख आणि वसप्पा बिराजदार यांनी कन्नड भाषेत लक्ष्मीशी संवाद साधत तिच्या गावाचा शोध घेतला. श्रद्धा फाउंडेशनचे डॉ. भरत वाटवानी यांच्या नेतृत्वाखाली डॉ. श्रीनिवास मोरे, समाजसेविका नीलम राणा शिरसाठ, सिद्धू थुमालवार, नीलेश गाडे व सहकाऱ्यांनी त्यासाठी प्रयत्न केले. आत्तापर्यंत ७३ रुग्णांचे पुनर्वसन आम्ही राज्यासह परराज्यांत यशस्वीपणे केल्याची माहिती मोहीम समन्वयक भाऊसाहेब माने यांनी दिली.